ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-III October 2012

# मानवी हक्क

प्रा. सरिता भिका जाधव,
समाजशास्त्र विभाग,
कर्म. शांतारामबापू कोंडाजी वावरे महाविद्यालय,
उत्तमनगर, सिडको नाशिक.

१ डिसेंबर १९५५ रोजी अमेरिकेच्या अलबामा राज्यातील मॉटेगोमंरी शहरात एक अभुतपुर्व घटना घडली तिचे पडसाद देशभर उमटले आणि समान नागरी हक्क चळवळीला एक तेज आणि ताकद प्राप्त झाली. सर्व माणसे समान हे अमेरिकन राज्यघटनेचे आधारभुत तत्व होते. तथापि दक्षिणेकडील भागात गोरे असे भेद करुन वंश द्वेष्टया भावनेने छळण्यासाठी अनेक अपमानास्पद व अन्यायकारक कायदे करण्यात आले होते. सार्वजनिक बसमध्ये रिकाम्या जागा असल्या तरी काळयांनी त्यावर बसायचे नाही, उभे रहायचे तेही मागच्या बाजुस अशा प्रकारचे कायदे होते. १ डिसेंबर हया दिवशी शिंपी काम करणा—या रोझा पार्कस हया कृष्णवर्णीय स्त्रीने अशा एका सीटवर बसण्याचे धाडस केले हा गुन्हाच होता. चालकाने बस थांबविली व पोलिसांना बोलविले शिक्षा व दंड झाला. मात्र या प्रसंगी या वृध्देने जेथे उतरविले तेथेच बसून राहण्याचा निग्रह केला व अमेरिकन सरकार प्रती निषेध नोंदविला. तिच्या हया हट्टाला जनतेकडून प्रतिसाद मिळु लागला. मार्टिन ल्युथर किंग यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी बसवाहतुकीवर बहिष्कार टाकला. ४१ हजार नागरिक कामावर पायी जाउ लागले. ३८१ दिवस हा बहिष्कार चालु होता. परिणामी अमेरिकेत सर्वोच्च न्यायालयाला त्याची दखल घ्यावी लागली व बस वाहतुकीतील भेदभावना हा कायदा रद्द करण्यात आला. यासंदर्भात ऑफ्रा विनफ्रे हया अमेरिकन टी.व्ही. वरील लोकप्रिय तरूण स्त्री कलाकाराने रोझा पार्कस ला श्रध्दाजंली वाहतांना असे म्हटले की, 'जर तिने त्या ठिकाणी बसून राहण्याचा हट्ट केला नसता तर आज मी ज्या ठिकाणी उभी आहे त्या ठिकाणापर्यंत येण्याची शक्ती व संधी मला कधीच मिळाली नसती. साधना, सदानंद वर्दे, मानवी अधिकार/मानवी हक्क हया शब्दांना प्राप्त करून दिले.

२० व्या शतकात आंतरराष्ट्रीय राजकारणात एक महत्वाचे घटीत म्हणून मानवी हक्क संकल्पनेचा उदय झाल्याचे दिसते. दुस—या महायुध्दापर्यंत राज्यप्रणीत हक्काची संकल्पना रूढ होती. राज्यसंस्थेद्वारे मान्य केले जाणारे व राज्यसंस्थेच्या कार्यक्षेत्राचे उपलब्ध असणारे व्यक्तिचे दावे म्हणजे हक्क अशी धारणा होती.

तथापि दुस—या महायुध्दानंतर उदयाला आलेल्या मानवी हक्क संकल्पनेचे राष्ट्र – राज्याच्या सीमा ओलांडून हक्क विषयक चर्चेला वेगळे परिणाम दिले. म्हणजे आता राज्याची मान्यता असो व नसो व्यक्तिला जन्मतच काही हक्क प्राप्त होतात ही संकल्पना अधिमान्य झाली आहे. टी.एच. ग्रीन यांनी या संदर्भात असे म्हटले आहे की, ‘ मानवाच्या आंतरिक विकासासाठी आवश्यक असलेली बाहय परिस्थिती म्हणजे हक्क होय.‘

हक्काची निर्मिती किंवा उदभव सामाजिक परिस्थितीमधूनच होत असतो. सामाजिक गरजेमधूनच हक्क उदयाला येत असतात. प्रा. लास्वींनी हक्कांना सामाजिक परिस्थितीचे घटक असे संबोधले आहे. सामाजिक जीवन ही मानवाची सर्वात महत्वाची गरज ठरते. तथापि सामाजिक जीवनाच्या काही अटी असतात आणि त्याचे पालन करण्याचे बंधनही समाजात वास्तव्य करणा—या प्रत्येक व्यक्तिवर येते. मानवाला आपल्या प्राथमिक किंवा जीवनाश्यक गरजांची पूर्तता करता यावी म्हणून त्यास निसर्गानेच काही सामर्थ्य प्रदान केलेले असते. परंतू सामाजिक जीवन जगतांना मनुष्य आपल्या निसर्गदत्त सामर्थ्यांचा वापर स्वतच्या मर्जीनुसार करू शकत नाही. समाजात अनेक व्यक्ति एकत्र वास्तव्य करीत असतात. अशा परिस्थितीत प्रत्येकाने आपल्या इच्छेप्रमाणे वागण्याचे ठरविले तर समाजात अराजक निर्माण होईल म्हणून समाजात वास्तव्य करणा—या प्रत्येक घटकाला सामाजिक नियमांचे पालन करणे किंवा सामाजिक नियमांच्या बंधनात राहणे भाग पडते. याचाच अर्थ समाजात राहतांना व्यक्तिच्या वर्तनावर बंधने येणे अगदी स्वाभाविक आहे. तथापि अशा प्रकारच्या निर्बंधामुळे व्यक्तिच्या विकासात अडसर निर्माण होणार नाही किंवा सामाजिक बंधनामुळे व्यक्तिच्या स्वातंत्र्याचा मोठया प्रमाणावर संकोच होणार नाही. याचीही दक्षता घ्यावी लागते. त्याकरिता समाजाने व्यक्तिला काही संधी देउ केलेल्या असतात. सामाजिक जीवनात व्यक्तिला प्राप्त झालेल्या अशा संधी किंवा सवलती म्हणजे हक्क होय. हक्कांची निर्मिती फक्त समाजातच होत असते. मनुष्य समाजाचा घटक म्हणून जगत नसता तर त्याला हक्कांची गरज भासली नसती. समाजात व्यक्तिच्या वर्तनावर काही बंधने घातली जातात पण ही बंधने असतांनाही व्यक्तिला आपली प्रगती साधने सहज शक्य व्हावे म्हणून हक्कांची गरज निर्माण होते.

**मानवी हक्क : उगम व विकास**

मानवाच्या इतिहासात डोकावले तर हक्कांची चळवळ फार पुर्वीपासून सुरू असल्याचे उल्लेख आढळतात. पश्चिम युरोपच्या विधिवत इतिहासाच्या विकासक्रमात याविषयी काही संदर्भ आढळतात. ‘उर‘ चा ‘उर नम्मु’ याने इ.स. पुर्व १७५० मध्ये स्थापन केलेली पहिली कायदेसंहिता, मेसोपोटेमियातील

हम्मुराबीच्या आचारसंहिता पार्शियन राज्यातील मानवी हक्क विषयक तत्वे, सायप्रस द ग्रेट या राजाने इ.स. पूर्व ४३९ मध्ये घोषित केलेले सायप्रस कॅलेंडर हे युरोपियन इतिहासातील महत्वपुर्ण दस्ताऐवज ठरतात. प्राचीन भारतात इ.स.पुर्व ३ च्या शतकात राजा अशोकाच्या राजवटीत नागरी हक्कांची पायाभूत तत्वे निर्माण करण्यात आली. कलिंगाच्या लढाईनंतर बौध्द धर्माचा स्विकार करुन अहिंसा, सहिष्णुता, पालक, गुरूजन, धर्म व गुरूप्रती कर्तव्यभावना, मिंत्राप्रती उदारता, सेवकांना मानवी वागणूक अशा मुलगामी तत्वांचा अंगिकार केला. वेद, बायबल, कुराण आणि कनफ्युशिअसचे ॲनालेक्टस हे प्राचीनतम ग्रंथसाहित्य आहे. ज्यात लोकांची कर्तत्व हक्क आणि जबाबदा—यांची चर्चा केलेली आहे. आधुनिक काळात इंग्लंडचा राजा जॉन याने १५ जुन १२२५ रोजी जाहिर केलेली ‘ मॅग्ना कार्टा’ ही हक्काची सनद राजाचे अधिकार मर्यादित करणारे १६२८ चे ‘ पिटिशन ऑफ राईटस’ आणि १६८९ चे बील ऑफ राईटस, १९७६ साली घोषित केलेली अमेरिकी हक्कांची सनद आणि १७८९ ची फ्रेच राज्यक्रांतीने उदघोषित केलेली मानवी हक्क संकल्पना हया घटना महत्वाच्या ठरतात.

१९१४ — १९१८ या काळातील पहिल्या महायुध्दाने घडविलेल्या प्रचंड मानवी संहारातून स्थैर्य व शांततेसाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर एखादी संघटना स्थापन्याची गरज निर्माण झाली. कारण केवळ राष्ट्र व राज्य हे व्यक्तिच्या हक्कांची जपणूक करू शकणार नाही हे लक्षात येउ लागले होते. त्यातूनच १९१९ मध्ये राष्ट्रसंघाची निर्मिती झाली मात्र ही संघटना मर्यादित प्रमाणातच कार्य करू शकली. १९१९ मध्ये आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या स्थापनेमुळे औद्योगिक क्षेत्रात मानवी हक्क संकल्पनेला बळकटी मिळाली. दुस—या महायुध्दानंतर मात्र अशा स्वरूपाच्या संघटनेची गरज तीव्र झाली. त्यातुनच संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना करणा—या सनदेवर २६ जून १९४५ रोजी स्वाक्ष—या करण्यात आल्या. भावी पिढयांना युध्दाच्या धोक्यापासून वाचविणे आणि मुलभूत मानवी हक्क, व्यक्तिप्रतिष्ठा, व्यक्तिमुल्य आणि स्त्रीपुरूषांचे समान हक्क या तत्वावंरील दृढ विश्वास व्यक्त करण्यासाठी हया संघटनेची निर्मिती झाली. संयुक्त राष्ट्राच्या सनदेतील १ च्या कलमची वंश, लिंग, भाषा व धर्म यावर आधारीत भेदभाव व करता मानवी हक्क आणि मुलभूत स्वातंत्रास प्रोत्साहन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य प्रस्थापित करणे आणि कोणत्याही प्रकारच्या भेदभावास बानूस सरिन हे महत्वपुर्ण उदिष्टे समाविष्ट करण्यात आले म्हणूनच मानवी हक्कांच्या संदर्भात ही सनद एक महत्वाचा दस्ताऐवज ठरतो. या एकूण प्रक्रियेबाबत साधक बाधक चर्चेअंती १० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने मानवी हक्कांच्या वैश्विक जाहिरनामा या ठरावाच्या स्वरूपात मसुदा स्विकारला. दूस—या महायुध्दानंतर निर्वसाहसीकरणाच्या प्रक्रियेने जोर धरल्यावर दण अमेरिका, आफ्रिका व

आशिया खंडातील अनेक वसाहती स्वतंत्र झाल्या. पुर्वाश्रमीच्या वसाहतील समाजातील बहुतांश राष्ट्रांनी संविधानाद्वारे लोकशाही शासनप्रणालीच्या स्विकार करून आपल्या नागरीकांना काही हक्क बहाल केले याद्वारे मानवी हक्क संस्कृतीचा पाया रचला आहे.

**भारतातील मानवी हक्कविषयक चळवळ :**

भारतातील गौतमबुध्द, ज्ञानेश्वर, कबीर, नामदेव, तुकाराम, इ. नी मुल्यांच्या सतत आग्रह धरला. राजाराम मोहनरॉय, म.फुले, महात्मा गांधी ते राजश्रीशाहु, बाबा आमटे इ. च्या कार्याच्या रूपाने मानवी हक्कांची ओळख होत गेली. भारतात स्वातंत्र्यप्राप्तीवर कायद्याचे अधिराज्य निर्माण करून धर्म, जात, लिंग, वंश, प्रदेश वा जन्मस्थान या आधारे कोणत्याही भेदभाव केला जाणार नाही याची हमी राज्यघटनेतुनचे देण्यात आली. अस्पृश्यतेचे उच्चाटन पदव्यांची समाप्ती, शोषणाविरूध्द मागण्याचा अधिकार दलितांसाठी आरक्षणाचे धोरण, आदिवासीसाठींही विशेष तरतुदी संविधानात करण्यात आल्या. भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांच्या मानवी अधिकारास पोषक अशी संकल्पनात्मक व किमान धोरणात्मक चौकट निर्माण केली.

शासकीय धोरणांच्या पातळीवर स्वातंत्रप्राप्तीनंतर सामाजिक आर्थिक विषमतेचे उच्चाटन करून अर्थपुर्ण लोकशाही रूजविण्यासाठी नेहरूंनी मिश्र अर्थव्यवस्थेचे प्रारूप स्विकारले. व्यापक प्रमाणात औद्योगिकरणाचा प्रकल्प हाती घेउन भारतीय अर्थ व समाजव्यवस्थेला आधुनिक करण्याचा मार्ग अवलंबला.

स्वातंत्रनंतरच्या पहिल्या दशकात सर्व सामाजिक शक्ती राष्ट्र बांधणीच्या कामात मग्न होत्या. त्यामुळे या विकास प्रारूपाची अंमलबजावणी व समाजीवरील परिणाम यातील समस्या पुढे आल्या नाहीत, परंतु १९६० च्या दशकात मात्र वाढती विषमता, बरोजगारी, नोकरशाहीची लाल फीत सार्वजनिक जीवनातील वाढता भ्रष्टाचार भाववाढ, विकास योजनांचा मर्यादित फायदा यासारखे दोष पुढे येउ लागले. १९६२ च्या चीनबरोबर युध्दातील अपयश, १९६५ चे पाकबरोबर युध्द व १९६६.६७ चा दुष्काळ या घटनांनी समस्या अधिकच तीव्र केली. याचा पहिला व्यापक फटका कॉग्रेसला १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत सहन करावा लागला. कारण कॉग्रेसचे लोकसभेतील संख्या प्रथमतच लक्षणिरित्या घटले आणि अनेक राज्यातील सत्ताही कॉग्रेसला गमवावी लागली.

१९६० च्या दशकाच्या उत्तरार्धातील भारतीय व्यवस्थेतील या समस्यापुर्ण वास्तवाला एका बाजूला नक्षलवादाच्या तर दुस—या बाजूला जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालील नवनिर्माण आंदोलनाच्या रूपात प्रतिसाद मिळाला भारतीय केंद्र शासनाने नक्षलवादीबरोबरच जे.पी.चे लोकांदोनही दमनकारी पध्दतीने मोडून काढण्याचा प्रयत्न केला. शासनाने हाती घेतलेल्या या दमनकारी उपायांच्या विरोधातच भारतात अनेक

नागरी हक्क गट उदयास आले नवनिर्माण आंदोलनातील लोक हक्क समित्या, विद्यार्थी समित्या लोकशाही हक्क संरक्षण संघटना १९७२ आंध्रप्रदेश नागरी स्वातंत्र समिती १९७४ ही त्याची प्रतिनिधिक उदाहरणे आहेत.

भारतात ख—या अर्थाने मानवी हक्क चळवळीचा उगम झाला तो १९७५ च्या राष्ट्रीय आणीबाणीच्या संदर्भात विरोधी पक्ष भारतात अराजक निर्माण करू पाहत आहेत. असा ठपका ठेवून इंदिरा गांधीनी १९७५ मध्ये राष्ट्रीय आणीबाणी लागु केली. या काळात भारतात मानवी हक्कांचे विशेषत नागरी राजकिय हक्कांचे व्यापक प्रमाणात उल्लंघन घडून आले. नागरी स्वातंत्रसाठी स्थापना करण्यात आलेल्या नागरी स्वातंत्र लोक संघटनेने या काळात महत्वाची भुमिका बजावली.

आणीबाणीनंतर भारतीय व्यवस्थेत दलित स्त्रिया, आदिवासी, अल्पसंख्याक यांच्या शोषणाविरूध्द आवाज उठवत अनेक सामाजिक चळवळी उदयास आल्या, दलित पॅथर, अनेक स्त्री संघटना, झारखंड मुक्ती मोर्चा, सेवा संघटना, चिपको आंदोलन, नर्मदा बचाव आंदोलन शेतकरी आंदोलने अशा चळवळी उदयाला आल्या परिणामी समाजातील शोषित व दुर्बल घटकांच्या रास्त हक्कांची मागणी पुढे आली. केवळ घटनात्मक तरतुदी करून त्यांच्या हक्कांचे संरक्षण होणार नाही तर त्यासाठी समर्पक कायदे करण्याबरोबरच अर्थपुर्ण विकास कार्यक्रमांची अंमजबजावणीही केली जावी असे प्रतिपादन करण्यात आले. आणीबाणीनंतर उदयाला आलेल्या या विविध चळवळींमुळे भारतातील मानवी हक्क चळवळीने नागरी राजकीय हक्कांच्या सीमा ओलांडून सामाजिक आर्थिक अधिकारांचा दावा पुढे आणला.

तथापि १९६१ च्या उदरीकरण, जागतिकीकरण धोरणाने समाजातील विशेषत दुर्बल घटकांच्या मानाविकारच्या भवित्यव्याविषयी अनेक आव्हाने निर्माण केली आहेत कारण दुर्बल घटकांच्या विकासासाठी आवश्यक शासनाची सामाजिक आर्थिक क्षेत्रातील सक्रिय भुमिका उत्तरोत्तर घटत आहे. आता खाजगी क्षेत्रावरच सामाजिक विकासाची प्रक्रिया सोपण्यावर भर दिला जात आहे.

१९९० व्या दशकात जमातवादाची समस्या पुढे आली. मुंबई दंगल १९९२ – ९३ गुजरातमधील नरसंहार २००२ यासारख्या घटनांनी अल्पसंख्याकांच्या हक्कांचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे. महाराष्ट्रातील खैरलांजी हत्याकांडाने दलित अत्याचाराचे कडू वास्तव उघडीस आणले आहे. शिक्षण रोजगाराच्या संधी उपलब्ध होउन देखील समाजातील स्त्रीविषयक दृष्टीकोन मुलगामीरित्या बदल असताना दिसून येत नाही. याउलट स्त्रीविरोधी अत्याचाराच्या नवनव्या घटना पुढे येत आहेत. दलित, आदिवासी कामगार, बालके या दुर्बल घटकांची स्थितीदेखील गुंतागुंतीची बनत आहे.

त्यामुळे जागतिकिरणाच्या काळात सामाजिक आर्थिक क्षेत्रातून होणारी शासनाची भुमिका तर दुस—या बाजुला नागरी राजकीय हक्कांबरोबरच सामाजिक आर्थिक अधिकारांचा सर्वांना उपभोग घेता यावा यासाठी आवश्यक व्यापक सामाजिक आर्थिक पुर्नरचनेच्या कार्यक्रमाची गरज अशा अंतविरोधी वास्तवात भारतीय व्यवस्थेतील मानवाधिकार चळवळ अडकली आहे.

**संदर्भ** :

१. सदानंद वर्दे, साधना, १० डिसेंबर २००५
२. व्ही.बी.पाटील, मानवी हक्क, के सागर पब्लिकेशन २००९, पुणे
३. एम.जी. कुलकर्णी . भारतीय समाजव्यवस्था, परिमल प्रकाशन, १९८७, औरंगाबाद